## प्रसिध्दी पत्रक

**श्रीमती अर्चना श्रीमंत कदम, वय-39 वर्षे तलाठी, तलाठी कार्यालय उस्मानाबाद (शहर) यांनी 25000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद च्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | **श्रीमती अर्चना श्रीमंत कदम, वय-39 वर्षे तलाठी, तलाठी सज्जा उस्मानाबाद (शहर)** |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.23.07.2020 रोजी तलाठी कार्यालय उस्मानाबाद (शहर) मध्ये |
| तपासी अधिकारी | श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक |
| लाचेची रक्कम मागणी | 34,000/- रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 25000/- रु लाच रक्कम स्विकारली |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे ऑनलाईन सातबाराला नोंद घेणे साठी |

यातील तक्रारदार यांना त्याचे व त्यांचे आजोबा यांचे प्लॉटचे ऑनलाईन सातबारा नोंद घेणेसाठी श्रीमती अर्चना कदम यांनी तक्रारदार यांचेकडे 34,000/- रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना श्रीमती अर्चना कदम, तलाठी , तलाठी कार्यालय उस्मानाबाद (शहर) यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.23.07.2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस निरीक्षक श्री. गौरीशंकर पाबळे यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने श्रीमती अर्चना कदम यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे वरील नमुद कारणासाठी दि.23.07.2020 रोजी पंचासमक्ष 34,000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 25,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे दि.23.07.2020 रोजी सापळा आयोजीत केला असता **श्रीमती अर्चना श्रीमंत कदम, वय-39 वर्षे तलाठी, तलाठी कार्यालय उस्मानाबाद (शहर)** यांनी तलाठी कार्यालया मध्ये तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्या मागणीप्रमाणे 25000/- रुपये लाच रक्कम स्वतः स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे आनंदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री.अरविंद चावरीया, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद, पोलीस उप अधीक्षक प्रशांत संपते, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक यांनी केली असुन सदर कारवाईस पोह/ रविंद्र कठारे, पोना/मधुकर जाधव, पोशि/विष्णु बेळे, समाधान पवार, महेश शिंदे, अर्जुन मारकड व चालक कांबळे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

**1)** मा.श्री.अरविंद चावरीया, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8530255500

**2) श्री. प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र. विभाग, उस्मानाबाद मोनं 9527943100**

**3)** श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 8888813720

**4)टोल फ्री क्र. 1064**, दूरध्वनी क्र.- 02472-222879

**E-Mail ID:-**dyspacbosmanabad@mahapolice.gov.in, 2)dysposmanabad@gmail.com

**(प्रशांत संपते)**
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद.